| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | : | 27 / | 09 / | 2022 |
| नोंदणी दिनांक | : | 27 / | 09 / | 2022 |
| निकाल दिनांक | : | 12 / | 12 / | 2024 |
| कालावधी | : | व. | म. | दिवस |
| | | 02 | 02 | 15 |

**भाग 'अ'**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आष्टी, ता.आष्टी, जि.बीड यांचे न्यायालयात**

(पिठासीन न्यायाधीश एस.व्ही.उतकर )

| | | |
|---|---|---|
| | **संक्षीप्त फौजदारी खटला क्र. ५९७/२०२२**<br>**CNR No.MHBI**14-002232-2022 | **निशाणी क्र.०९** |
| | **निकाल तारीख –** | १२/१२/२०२४ |
| | गुन्हा क्र.१०५/२०२२ | पोलीस स्टेशन, अंभोरा, ता.आष्टी, जि.बीड. |
| **फिर्यादी –** | | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस स्टेशन, अंभोरा, ता.आष्टी, जि.बीड. |
| **फिर्यादीचे वकील–** | | सरकार तर्फे सरकारी अभियोक्ता श्री.सी.ए.जावळे |
| **आरोपी –** | | गहीनीनाथ शंकर बोराडे, वय ५० वर्षे,<br>रा.बोरडवाडी, ता.आष्टी, जि.बीड. |
| **आरोपीचे वकील–** | | श्री.बी. एस. लटपटे |

**भाग 'ब'**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा तारीख | – | २५/०६/२०२२ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | – | २५/०६/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | – | २७/०९/२०२२ |

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे प्रतिकथन नोंदविल्याची तारीख | – | ०८/०६/२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | – | ०८/०६/२०२३ |
| प्रकरण निकालासाठी ठेवल्याची तारीख | – | १२/१२/२०२४ |
| निकालाची तारीख | – | १२/१२/२०२४ |
| शिक्षा सुनावल्याच्या आदेशाची तारीख, असल्यास | – | – |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | गुन्हा कलम | निर्दोष मुक्तता केली की शिक्षा सुनावली | सुनावलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता सुनावणी दरम्यान न्यायबंदीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | गहीनीनाथ शंकर बोराडे | – | – | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) | निर्दोष मुक्त केले | – | – |

**भाग 'क'**

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्ष –**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १) | बाबासाहेब जबाजी बोराडे | घटनास्थळ पंच | ०९ लगत |

**ब. बचाव पक्ष, असल्यास –**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| – | – | – |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास –**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| — | — | — |

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन निशाणीची यादी**

**अ. अभियोग पक्ष –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १) | ११ | घटनास्थळ पंचनाम्यावरील पंचाची सही |

**ब. बचाव पक्ष –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| — | — | — |

**क. न्यायालयीन निशाणी –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| — | — | — |

**ड. वस्तु –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| — | — | — |

**न्यायनिर्णय**

( दिनांक १२/१२/२०२४ रोजी घोषित)

प्रस्तुत खटला आरोपी विरुध्द त्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केले बाबत दाखल करण्यात आला आहे.

(2) **अभियोग पक्षाचे खटल्याची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे** :–

फिर्यादी सुवर्णा साहेबराव पालवे, म.पो.ना.८७, पोलीस स्टेशन, अंभोरा, ता.आष्टी,

जि.बीड या दिनांक २५/०६/२०२२ रोजी त्यांचे सोबत सहाय्यक फौजदार ११११ सानप, पोलीस हवालदार १२३६ पवार असे खाजगी वाहनाने अर्ज चौकशी कामी बोरडवाडी येथे जात असतांना त्यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, धामणगांव ते बोरडवाडी रोडवर वंजारवाडी शिवारात आरोपी नामे गहिनीनाथ शंकर बोराडे, रा.बोरडवाडी हा त्याचे चहापाण्याच्या हॉटेलमध्ये विनापरवाना बेकायदेशिरित्या देशी दारु जवळ बाळगुन त्याची चोरटी विक्री करत आहे. आशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने त्यांनी दोन पंचास बोलावुन घेवुन त्यांना बातमीचा उद्देश कळवुन बातमीचे ठिकाणी जावुन अचानक १६.०० वाजता छापा मारला असता दारु विक्री करणारा ईसम हा त्यांना पाहुन त्यांच्या ताब्यातील पांढऱ्या रंगाची पिशवी जागेवर सोडून पळुन गेला. सदरील पिशवीमध्ये देशी दारु बॉंबी संत्रा कंपनीच्या १८० मिली च्या सिलबंद काचेच्या २१ बाटल्या मिळुन आल्या. सदरील बाटल्या त्यांनी जप्ती पंचनामा करुन ताब्यात घेतल्या व त्यापैकी एक दारुची बाटली वेगळी काढुन सी.ए. तपासणी करीता राखुन ठेवली. त्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशन अंभोरा येथे जावुन आरोपीच्या विरुध्द प्रस्तुत खटल्यातील फिर्याद दाखल केली.

(3) सदर फिर्याद वरुन आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन अंभोरा येथे गुन्हा क्र.१०५/२०२२ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. प्रस्तुत गुन्हयाच्या तपासादरम्यान तपासी अंमलदार यांनी जप्त मुद्देमालापैकी काढून ठेवलेले सॅम्पल रासायनिक तपासणीसाठी वैज्ञानिक प्रयोगशाळा, औरंगाबाद येथे पाठविले. पुढे त्यांनी साक्षीदारांकडे चौकशी करुन त्यांची तपास टिपणे नोंदविली. त्यांचे तपासामध्ये आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने तपासाअंती त्यांनी आरोपी विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

(4) प्रस्तुत कामी आरोपी हजर झालेनंतर या न्यायालयाने निशाणी ०९ वर आरोपीचे

प्रतिकथन नोंदवुन त्यातील मजकूर आरोपीस मराठी भाषेत वाचुन व समजावुन सांगितला. आरोपीने गुन्हा नाकबुल केला व खटला पुढे चालविण्याची विनंती केली आहे.

(5) अभियोग पक्षाने खटला शाबीत करण्याकरीता वरील भाग 'क' मध्ये नमुद केल्याप्रमाणे साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे. पुढे अभियोग पक्षास पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी उर्वरीत साक्षीदारांची साक्ष नोंदविली नसल्याने नि.१ वरील आदेशान्वये अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

(6) अभिलेखावरील पुराव्याच्या आधारे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३(१)(ब) अन्वयेचे जबाब वगळण्यात आले.

(7) अभिलेखातील फिर्याद, पुरावा आणि युक्तीवाद यावरुन खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. त्या मुद्दयांवरती पुढे दिलेल्या सविस्तर कारणांसह निष्कर्ष देण्यात येतो.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक २५/०६/२०२२ रोजी १६.०० वाजण्याचे सुमारास मौजे वंजारवाडी, ता.आष्टी, जि.बीड येथे धामणगांव ते बोरडवाडी रस्त्यावर वंजारवाडी शिवारात चहा पाण्याच्या हॉटेलमध्ये आरोपी हा स्वतःच्या फायदयासाठी विनापरवाना बेकायदेशीररित्या देशी दारु बॉबी संत्रा कंपनीच्या १८० मि.ली.च्या २१ सिलबंद बाटल्या स्वतःच्या ताब्यात बाळगुन तिची चोरटी विक्री करत असताना मिळून आला आणि त्याद्वारे त्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | ..नकारार्थी.. |
| २. | काय आदेश ? | आरोपीस निर्दोष मुक्त केले. |

**<u>का र ण मि मां सा</u>**

(8) अभिलेख पडताळले. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.सी.ए.जावळे व आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.लटपटे यांचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र. १ करिता** :

(9) अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ बाबासाहेब जबाजी बोराडे यांनी त्यांच्या सरतपासात त्यांना पोलीसांनी पंचनाम्यासाठी बोलावुन घेतले नव्हते व त्यांच्या समक्ष पोलीसांनी कोणताही पंचनामा केला नसल्याचे कथन केले आहे. सदरील साक्षीदार यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचा विस्तृत उलटतपास घेतलेला आहे. परंतु, त्यांनी जप्ती पंचनाम्याच्या अनुषंगाने विचारलेल्या सर्व सुचक प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिली आहेत.

(10) अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता साक्षीदार क्र.१ घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार याने अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे अभिलेखावरील घटनास्थळ व जप्ती पंचनामा शाबीत झालेला नाही. तसेच सदर प्रकरण हे जुने असुन सदर प्रकरणामध्ये साक्ष समन्स काढण्यात आली. परंतु अभियोग पक्ष सदर प्रकरणात इतर साक्षीदार हजर ठेवु शकले नाहीत. सदर प्रकरणातील आरोपी हा प्रत्येक तारखेला न्यायालयासमक्ष हजर असुन तसेच सदर प्रकरणातील फिर्यादी व तपासी अंमलदार यांना वारंवार साक्ष समन्स काढुन देखील ते न्यायालयामध्ये अभियोग पक्ष सदर साक्षीदारांना हजर ठेवु शकले नाही. सदर प्रकरणात स्वतंत्र अशा साक्षीदार तपासणे आवश्यक होते परंतु त्या बाबत अभियोग पक्षाने कसल्याही प्रकारची दखल घेतलेली नाही. तसेच मुददेमाल हा आरोपीचे ताब्यातुन जप्त केला याबाबत ठोस पुरावा अभिलेखावर दाखल करणे आवश्यक होते परंतु त्याबाबत कसल्याही प्रकारचा पुरावा अभियोग पक्षाने दाखल केलेला नाही. आरोपीवरील तोहमत अपराधाची

घटक अभियोग पक्षाने शाबीत करणे आवश्यक होते. परंतु अभियोग पक्ष हे त्या बाबत कसल्याही प्रकारचा ठोस पुरावा अभिलेखावर देवु शकलेला नाही. आरोपीच्या विधीज्ञांच्या युक्तीवादानुसार वार्षिक कोटा भरण्यासाठी अशा प्रकारची प्रकरणे दाखल केली जातात. तसेच त्यांच्या युक्तीवादानुसार सदरची दारु ही हॉटेल मध्ये दारु विक्री करीत असल्याचे आरोपी मिळुन आला असला तरी त्याबाबत कसल्याही प्रकारचा कागदोपत्री पुरावा दोषारोप पत्रासह दाखल केला नाही. परंतु त्या बाबत तपासी अंमलदाराने सविस्तर तपास करुन सदरचे हॉटेल हे कोणाच्या मालकीचे होते व त्या बाबत कागदोपत्री पुरावा दोषारोप पत्रासोबत दाखल करणे आवश्यक होते. परंतु सदर दोषारोप पत्राचे अवलोकन केले असता याबाबत कसल्याही प्रकारचा पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच तपासी अंमलदाराने दोषारोप पत्रासोबत पंचाना अंगझडती दिली त्याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल करणे आवश्यक होते परंतु त्याबाबत त्यांनी कसल्याही प्रकारचे कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तपासी अंमलदाराने हॉटेल हे कोणाच्या मालकीचे होते आणि कित्येक दिवसापासुन आरोपी हा तिथे दारु ची चोरटी विक्री करीत होता याबाबत सविस्तर तपास करुन इतर साक्षीदाराचे जबाब नोंदविने आवश्यक होते. परंतु सदर दोषारोप पत्राचे अवलोकनावरुन व अभियोग पक्षाच्या युक्तीवादावरुन त्यांनी आरोपी विरुध्द तोहमत अपराधाचे घटक निशंकोचपणे शाबीत करु शकलेला नाही. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी व तपासी अंमलदार यांची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. तसेच, अभियोग पक्षाने त्यांचे व्यतिरिक्त अन्य स्वतंत्र अशा कोणत्याही साक्षीदाराची साक्ष प्रस्तुत खटल्यात नोंदविण्यात आलेली नाही व स्वतंत्र साक्षीदाराच्या मदतीने प्रस्तुत खटल्यातील घटना अभियोग पक्षाने सिध्द केलेली नाही. तसेच, रासायनिक तपासणी अहवाल अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यामुळे सदरील मुद्देमाल हा आरोपीकडूनच जप्त करण्यात आला होता या बाबत ठोस पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे एकंदरीत आरोपी विरुध्द लावण्यात आलेल्या गुन्हया बाबत संशय निर्माण होतो व तो

अभियोग पक्षाने सबळ पुराव्यानिशी सिध्द केलेला नाही. वरील सर्व बाबी विचारात घेता अभियोग पक्ष आरोपीवरील तोहमत अपराधाचे घटक निसंकोचपणे शाबीत करु शकलेला नाही. सबब मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष 'नकारार्थी' देण्यात येतो.

**मुद्दा क्र. २ करिता** :

(11) वरील सर्व विवेचनावरुन असे स्पष्ट होते की, अभियोग पक्ष आरोपी वरील अपराध सर्व संशया पलीकडे शाबीत करु शकलेला नाही. त्यामुळे आरोपी संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहे. आरोपी वरील तोहमत अपराध अभियोग पक्ष शाबीत करु शकलेला नाही. त्यामुळे आरोपीस खटल्यातुन निर्दोष मुक्त करणे न्यायोचित होईल. सबब मुद्दा क्र.१ चे निष्कर्षाचे अनुषंगाने मुद्दा क्र.२ बाबत खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. आरोपी गहीनीनाथ शंकर बोराडे यास फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) च्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीने यापूर्वी दिलेले जामीन बंधपत्र रद्द करण्यात आले.

३. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ च्या तरतुदी अन्वये आरोपीने रक्कम रुपये १५,०००/– चे स्वीय्य व जामीन बंधपत्र सादर करावे.

४. प्रस्तुत खटल्यातील जप्त मुद्देमाल अपिल कालावधी संपल्यानंतर त्याची नियमानुसार योग्य विल्हेवाट लावण्यासाठी अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे पाठविण्यात यावा.

५. निकाल खुल्या न्यायालयात जाहीर.

SNEHA VENKATRAO UTKAR
Digitally signed by SNEHA VENKATRAO UTKAR
Date: 2024.12.23 11:40:57 +0530

( एस.व्ही.उतकर )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
आष्टी, जि.बीड

ठिकाण – आष्टी
दिनांक – १२/१२/२०२४

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment / order"

Dictated on : -
Transcribed on : -
Checked & signed on : -

**Sd/-**
Jalindar B. Pokale,
(Stenographer Grade-III)